**ठळक बातम्या**

- आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून प्रतिपादन

- देशाचे नवीन संरक्षण दल प्रमुख म्हणून जनरल एन.एस. राजा सुब्रमणी, तर नौदल प्रमुख म्हणून ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी पदभार स्वीकारला

- मराठा आरक्षणप्रश्नी मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर सरकारनं कोणतंही नवं आश्वासन दिलं नसल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची स्पष्टोक्ती

- परदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात भारतीय बाजारपेठेतून सुमारे ३२ हजार ९६३ कोटी रुपये काढून घेतले

आणि

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत

<><><><><>

आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या १३४ व्या भागात देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधत होते. कोकणातल्या हापूसप्रमाणेच देशाच्या विविध भागात आढळणाऱ्या आंब्याच्या प्रकारांचा उल्लेख करुन त्यांनी आंबा उत्पादनाचा प्रवास गावखेड्यातून जागतिक बाजारपेठेपर्यंत झाला आहे असं सांगितलं.

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट असून, त्यादृष्टीनं नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं. कोकम सरबत, सोलकढी अशा पेयांचा उपयोग उष्णतेपासून बचावासाठी करावा असं ते म्हणाले. ही पेयं, देशाच्या विविध प्रदेशातल्या परंपरांचा अविभाज्य भाग आहेत, असं ते म्हणाले.

अलिकडेच केलेल्या ५ देशांच्या दौऱ्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला.

नेदरलँड्स भेटीत ‘चोल’ साम्राज्य काळातला प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्र सरकार देशाच्या अशा अमूल्य वारशांचं जतन संवर्धन करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले. छत्तीसगडमध्ये तीन दुर्मिळ ताम्रपटांचा शोध लागल्याची माहिती त्यांनी दिली.

क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडूंनी अलिकडेच केलेल्या कामगिरीचा गौरव त्यांनी केला. अलिकडेच झारखंडमध्ये रांची इथं झालेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स महासंघाच्या स्पर्धेत देशभरातून आठशे खेळाडू सहभागी झाले. या स्पर्धेत चार वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांमध्ये चार राष्ट्रीय विक्रम मोडीत निघाले अशी माहिती त्यांनी दिली. नवे विक्रम रचणारे गुरिंदरवीर सिंह, विशाल टीके, तेजस्विन शंकर, देव मीणा आणि कुलदीप कुमार या सर्व खेळाडूंचं त्यांनी अभिनंदन केलं. अवघ्या दोन दिवसांत पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडीत निघाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. ही कामगिरी केलेल्या गुरिंदरवीर सिंह आणि अनिमेष कुजूर या दोन्ही खेळाडूंचं कौतुक करत त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी थेट संवादही साधला.

भारतीयांच्या खगोलशास्त्राच्या आवडीबद्दल प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये चर्चा केली. या निमित्तानं आपल्या वेधशाळांचे महत्त्व त्यांनी सांगितलं. तरुणांनी आकाश निरीक्षणाची आवड जोपासावी असं आवाहन त्यांनी केलं.....

- **- होल्ड बाईट - MKB CHAND KHAGOLSHASTRA - -**

‘नमामि गंगे अभियान अंतर्गतच्या ‘डॉल्फिन बचाव रुग्णवाहिका’ या उपक्रमाबद्दल आणि डॉल्फिनच्या संरक्षणासाठी होत असलेल्या त्याच्या उपयोगाविषयी देखील त्यांनी सांगितलं. याच अनुषंगाने नदी आणि जल संवर्धनासाठी देशभरात होत असलेल्या प्रयत्नांविषयी देखील त्यांनी सांगितलं.

लोकांची सेवा करण्यासाठी प्रचंड संसाधनांची गरज नसते, तर त्यासाठी फक्त एक चांगला हेतू आणि सातत्यपूर्ण प्रयत्न पुरेसे असतात, असं ते म्हणाले. देशातल्या प्रत्येक गावात आणि शहरात आपल्याला प्रेरणा देणाऱ्या असंख्य गोष्टी घडत आहेत. अनेकदा या प्रयत्नांची फारशी चर्चा होत नाही, पण जेव्हा आपल्याला त्याची जाणीव होते, तेव्हा आपला देश या सामर्थ्याच्या बळावर पुढे वाटचाल करत असल्याचा आपला विश्वास अधिक दृढ होतो असं ते म्हणाले. नागरिकांनी आपल्या आसपासच्या अशा प्रयत्नांचा शोध घ्यावा, जे समाजासाठी

चांगले काम करत आहेत त्यांची दखल घ्यावी - त्यांचं कौतुक करावं, त्यांच्याकडून शिकावं आणि शक्य असल्यास अशा काही चांगल्या कामात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

जनरल एन.एस. राजा सुब्रमणी यांनी  आज देशाचे नवीन संरक्षण दल प्रमुख  म्हणून पदभार स्वीकारला. नवी दिल्लीत साऊथ ब्लॉक प्रांगणात त्यांना मानवंदना देण्यात आली. पाकिस्तान आणि चीनविषयक तज्ज्ञ, अशी  ओळख असलेले जनरल सुब्रमणी, यापूर्वी राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार म्हणून कार्यरत होते. गेल्या वर्षी ३१ जुलै रोजी लष्कर उपप्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. ४० वर्षांपेक्षा दीर्घ कारकिर्दीत, जनरल सुब्रमणी यांनी विविध प्रकारच्या संघर्षमय परिस्थितीत आणि भौगोलिक प्रदेशात सेवा बजावली, आणि भारतीय लष्करामध्ये  महत्वाच्या पदांवर काम केलं.

<><><><><>

ॲडमिरल कृष्णा स्वामिनाथन यांनी आज देशाचे २७ वे नौदल प्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी यांच्याकडून त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांना संबोधित केलं.

देशाचं हित जपण्याप्रति, भारतीय नौदल सदैव सतर्क असून, प्रादेशिक सुरक्षेबाबत सध्याच्या आव्हानात्मक, जटिल, अनपेक्षित आणि अनिश्चित वातावरणात नौदल सक्रियपणे तैनात असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना त्यांच्या मागण्या संदर्भात सरकारने यापूर्वी दिलेली आश्वासनं सर्वांना माहीत असून कोणतंही नवं आश्वासन सरकारने दिलं नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. ते अहिल्यानगर इथं आज वार्ताहरांशी बोलत होते. महायुतीचं सरकार मराठा समुदायाला न्याय देण्यासाठी सातत्याने काम करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणा संदर्भातल्या मागण्यांसाठी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं बेमुदत उपोषण सुरू केलं होतं. सरकारच्या प्रतिनिधींनी त्यांना १२ कलमी प्रस्ताव दिल्यावर काल रात्री त्यांनी उपोषण मागे घेतलं.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त त्यांना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. अहिल्याबाईंचं जन्मस्थान, अहिल्यानगर जिल्ह्यातल्या चोंडी इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत अभिवादन सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. मुंबईत चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळच्या अहिल्याबाईंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयांच्या वतीनं आज मुंबईत अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात अहिल्यादेवी होळकर स्मारकाचं उद्घाटन झालं. यावेळी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना शिंदे यांच्या हस्ते धनगररत्न पुरस्कार प्रदान देऊन गौरवण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर इथं कोकणवाडी परिसरातल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला विविध पक्ष संघटनांतर्फे अभिवादन करण्यात येत आहे. तसंच शोभायात्रा, धनगरी डफ आणि वाघ्या-मुरळी स्पर्धेचं आयोजन करण्यात येणार आहे.

<><><><><>

परदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात भारतीय बाजारपेठेतून सुमारे ३२ हजार ९६३ कोटी रुपये काढून घेतले. त्यामुळे चालू वर्षात बाहेर पडलेल्या परदेशी गुंतवणुकीचीआतापर्यंतची रक्कम सुमारे सव्वा दोन लाख कोटी रुपये झाली आहे. गेल्या वर्षी म्हणजे २०२५मधे परदेशी गुंतवणूकदारांनी एक लाख ६६ हजार कोटी रुपये काढून घेतले होते.

गेल्या फेब्रुवारीत २२ हजार ६१५ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक भारतात आली, मात्र मार्चमधे पुन्हा एक लाख १७ हजार कोटी रुपयांचा ओघ बाहेर झाला.

<><><><><>

तंबाखूच्या सेवनापासून असलेल्या धोक्यांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी आज ‘जागतिक तंबाखू विरोधी दिवस’ पाळला जात आहे. तंबाखू सेवन पूर्णपणे थांबवण्यासाठी

जागतिक आरोग्य संघटनेनं हाती घेतलेला हा जागतिक कार्यक्रम आहे. ‘आकर्षणाचा मुखवटा उतरवू- निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनावर मात करू’, ही यंदाच्या या दिवसाची संकल्पना आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत होणार आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

बंगळुरुनं पहिल्या क्वालिफायरमध्ये गुजरातला नमवूनच अंतिम सामन्यात प्रवेश केला. तर गुजरातनं दुसऱ्या क्वालिफायरमध्ये राजस्थानला नमवून अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला होता.

दोन्ही संघांनी केवळ एकेकदाच या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. गेल्यावर्षी पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकणारं बंगळुरु आपलं विजेतेपद कायम राखण्यासाठी उत्सूक असेल तर, गुजरातही दुसऱ्यांदा ही स्पर्धा जिंकण्यासाठी प्रयत्नशील असेल.

<><><><><>

राज्यातल्या आगामी विधानपरिषद निवडणुकीत परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विवेक नवादार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी समाजमाध्यमावरून ही माहिती दिली. सध्या परभणी महानगरपालिकेत शिवसेनेचा महापौर आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष रायगड, जळगांव, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि नाशिक या मतदारसंघातूनही निवडणूक लढवत आहे.

या निवडणुकीसाठी उद्या १ जून हा अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे, तर मतदान आणि मतमोजणी २२ जून ला होणार आहे.

//<><><><><>//